संदर्भ :-

१. मे. अंबर्भे हाऊसिंग इंडिया प्रा.लि. अर्थट कंस्ट्रक्शन इंडिया प्रा.लि. यांचे.पितळसर-मानपाडा ता.जि.ठाणे यांचा दिनांक १८/०२/२०२० रोजीचा अर्ज.

२. ठाणे महानगरपालिकेकडील VP No. SO४/०१६३/१९/New No. TMC/TDD/ ३३९५/२० दिनांक ०९/०१/२०२० रोजीचे बांधकाम प्रारंभ पत्र.

३. महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन व (विकास विनियमन) नियम २०१३

४. महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) (सुधारणा) नियम २०१५

५. जिल्हा खनिकर्म अधिकारी यांचेकडील स्थळपहाणी अहवाल दिनांक- ०४/०३/२०२०

६. कार्यालयीन मंजूर टिपणी दिनांक ०६/०३/२०२०

क्रमांक रेसीएट/गौखनि-२/एस.आर.-३१/२०२०
जिल्हाधिकारी कार्यालय,ठाणे
दिनांक १३/०३/२०२०

ज्याअर्थी मे. अंबर्भे हाऊसिंग इंडिया प्रा.लि. अर्थट कंस्ट्रक्शन इंडिया प्रा.लि. तर्फे श्री. मितेश पन शहायांनी मौजे पितळसर-मानपाडा ता.जि.ठाणे येथील स.नं.६६/८/४,६६/२/२ व ६१/२/१ एकूण क्षेत्र ५५४०० चौ.मी. पैकी मागणी ५५२१ चौ.मी. या जागेपर १०००० ब्रास दगड, साधी माती, मुरुम या गौणखनिज उत्खनन परवानगी मिळणेसाठी याकरीता [illegible] रुपये या कार्यालयात अर्ज दाखल केलेला आहे.

जागेचा तपशिल

तालुका	गावाचे नाव	स.नं./हिस्सा नंबर	क्षेत्र
ठाणे	पितळसर -मानपाडा	६६/८/४,६१/२/२ व ६१/२/१	खाणकामाखालील क्षेत्र ५५२१ चौ.मी.

आणि ज्याअर्थी मे. अंबर्भे हाऊसिंग इंडिया प्रा.लि. अर्थट कंस्ट्रक्शन इंडिया प्रा.लि. यांनी केलेल्या अर्जानुसार जिल्हा खनिकर्म अधिकारी ठाणे यांचेमार्फत सदर जागेची स्थळपहाणी करण्यात आली आहे व दि ०४/०३/२०२० रोजी अहवाल सादर केलेला आहे.

आणि ज्याअर्थी उपरोक्त नमुद जागेत १०००० ब्रास दगड,साधी माती,मुरुम या गौण खनिजाचे उत्खनन व वाहतुकीकरीता महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) (सुधारणा) नियम, २०१५ मधील अनुसूची एक मध्ये दर्शविल्यानुसार निश्चित केलेल्या दराप्रमाणे स्वामित्वधन शासनजमा करण्यास तयार आहेत. तसेच आवश्यक असलेली शासकीय फी खालीलप्रमाणे अर्जदार शासनजमा करण्यास तयार आहेत.

अ.क्र.	तपशिल	शासन जमा करावयाची रक्कम	चलन/टी.सी.एस क्रमांक	रक्कम चलनाने बँकेत भरणा दिनांक
१	अर्ज फी	५०००/-	९८१	दि. १३/०३/२०२०
२	स्वामित्वधन (१०००० ब्रास)	४०००००/-	९८२	
३	टी.सी.एस (२.५)	८२४००/-	६२०	
४	भूपृष्ठ भाई (५५२१ चौ.मी.)	२१,५०१/-	९८३	
५	जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधी (स्वामित्वधनाच्या १०%)	४००००/-	६२०	
	एकूण	४५१३९०१/-		

आणि ज्याअर्थी अर्जदार यांनी १०००० ब्रास गौणखनिज वाहतुकीकरीता वापरण्यात येणा-या वाहनाबाबत [illegible] प्रमाणे माहिती सादर केलेली आहे.

अ.क्र.	ट्रक क्रमांक	वाहतुक करणाऱ्या गौणखनिजाचे परिमाण ब्रास	दिवसभरात ट्रकने केलेल्या फे-यांची संख्या	दिवसभरात गौण खनिजांची केलेली एकुण वाहतुक	१०००० ब्रास वाहतुकीस आवश्यक कालावधी
१	MH 04 GF 0921	४	४	१६	५ महिने
२	MH 04 GF 0922	४	४	१६	
३	MH 04 GF 0923	४	४	१६	
४	MH 04 GF 0924	४	४	१६	
५	MH 04 GF 0925	४	४	१६	
			एकुण	८०	

त्याअर्थी मी अपर जिल्हाधिकारी ठाणे महाराष्ट्र गौणखनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम २०१३ मधील नियम ५९ (एक) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून या आदेशाव्दारे अर्जदार मे. ओम राऊसिंग इंडिया प्रा.लि. असेट कंस्ट्रक्शन इंडिया प्रा.लि. तर्फे श्री. मितेश एन शहायांनी मौजे-चितळसर-मानपाडा ता.जि.ठाणे येथील स.नं.६१/१/४,६१/२/२ व ६१/२/१ एकूण क्षेत्र ५५४०० चौ.मी. पैकी मागणी क्षेत्र ५५२१ चौ.मी. खोलगांवर १०००० ास दगड,साधी माती,मुरुम या गौणखनिजासाठी उत्खननाची परवानगी महाराष्ट्र गौणखनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ मधील नियम ६६ व ६७ मधील अटी व शर्ती व इतर अटी व शर्तींना अधिन राहून मंजुर करण्यात येत आहे.

६.ज्या शर्तींवर खाण परवाना देण्यात येईल त्या शर्ती:-

(१) सदर वाहतुक ही मौजे चितळसर-मानपाडा या ठिकाणाहून मौजे स.नं.५७/१२ पिपलास ता. जि. ठाणे या ठिकाणापर्यंत करणेस परवानगी देणेत येत आहे. याव्यतिरिक्त इतर ठिकाणाहून उत्खनन अथवा इतर ठिकाणी वाहतूक केल्यास तो अनधिकृत धरली जाऊन त्यावर दंडात्मक कारवाई केली जाईल तसेच वाय प्रत्येक परवान्यावर नमूद करणे आवश्यक राहील.

(२)नियम ५९ व ६० अन्वये देण्यात आलेल्या प्रत्येक खाण परवान्यात अशी शर्त असेल की,कोणत्याही खाणीच्या पृष्ठभागापासूनची खोली सहा मीटरपेक्षा अधिक असणार नाही.

(३)नियम ५९ व ६० अन्वये देण्यात आलेल्या कोणत्याही खाण परवान्यात,परवाना देणा-या सक्षम अधिकाऱ्याला पुढील बाबींच्या संबंधात आवश्यकता वाटेल अशा इतर शर्तींचा अंतर्भाव करता येईल:

(क) भाडे व स्वामित्वधनाच्या रकमेची मर्यादा आणि ते भरण्याची पध्दत व ठिकाण

(ख) परवान्यात समाविष्ट असलेल्या जमिनींच्या नुकसानीबद्दलची नुकसान भरपाई

(ग) वृक्षतोड

(घ) कोणत्याही प्राधिकरणाने विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही क्षेत्राच्या पृष्ठभागावरील कामास निर्बंध

(ङ) कोणत्याही राखीव क्षेत्रातप्रवेश करणे व काम करणे.

(च) अपघाताची माहिती देणे.

(छ) ग्रयस्थ पक्षकाराच्या दाव्यांकरता शासनाकडे करावयाची क्षतिपूर्ती.

(ज) ज्या कालावधीत गौणखनिजाचे उत्खनन करण्यात येईल व ते काढून नेण्यात येईल तो कालावधी.

(झ) परवाना संपुष्टात आल्यावर किंवा रद्द झाल्यावर उरलेल्या मालमत्तेचे समपहरण.

(४)ज्यासाठी परवाना दिलेला असेल ते खनिज वगळता इतर कोणत्याही खनिजाचे सक्षम अधिकाऱ्याकडून योग्य ती मंजूरी मिळाल्याशिवाय उत्खनन करता येणार नाही किंवा ते काढून नेता येणार नाही.

(५)ज्यासाठी परवाना देण्यात आला असेल, त्या व्यतिरिक्त कोणतेही गौणखनिज किंवा मुख्य खनिज खाणकाम करताना आढळून आल्यास, ही बाब आढळून आल्यानंतर एका आठवड्याच्या कालावधीत सक्षम अधिकाऱ्याला कळवण्यात येईल.

(६)परवानाधारक,परवाना क्षेत्रातून उत्खनन केलेले गौणखनिज, काढून नेलेल्या गौणखनिजाचे प्रमाण,विक्री प्रमाणक, कामासाठी नेमलेल्या कामगारांची व त्यांना दिलेल्या पगाराची नोंदवही,या प्रयोजनासाठी आकारणी योग्य असलेले स्वामित्वधन व इतर अधिकार यांचे संपूर्ण अद्यूक लेखे ठेवील.

(७)परवानाधारकाने सर्व अपघातांची माहिती सक्षम अधिकारी आणि ज्या जिल्ह्यात ते क्षेत्र असेल, त्या जिल्ह्याच्या जिल्हादंडाधिकारी व जिल्हा पोलीस अधिक्षक यांना तात्काळ दिली पाहिजे.

(८)परवान्याची मुदत संपल्यानंतर परवाना क्षेत्रात पडून राहिलेल्या खाणीतील खनिज मालावर व इतर मालमत्तेवर परवानाधारकाचा कोणताही हक्क असणार नाही.

(९)विभागीय वन अधिका-याने किंवा त्याबाबतीत त्याने प्राधिकृत केलेल्या अशा अधिका-याने निश्चित केलेली नुकसानभरपाईची रक्कम भरल्याशिवाय किंवा त्यांच्या पूर्वमान्यतेशिवाय, परवानाधारक कोणतेही झाड तोडणार नाही किंवा त्याला इजा पोचवणार नाही.

(१०) परवानाधारक कोणतेही सार्वजनिक रस्ते, सार्वजनिक इमारती किंवा मंदीरे, नदया, नाले, जलाशय, दफनभूमी, रेल्वेमार्ग इत्यादीपासून पन्नास मीटरसंच्या अंतरावर आत खाणकाम करणार नाही आणि कोणत्याही सार्वजनिक किंवा खाजगी मालमत्तेला हानी पोचवणार नाही.

(११)परवानाधारक हा भूविज्ञान आणि खनिकर्म संचालक यांनी प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिका-याला आणि खाणीची जमीन ज्यांच्या अधिकार क्षेत्रात येते त्या स्थानिक महसूल किंवा वन प्राधिका-याला परवान्याखालील खाणक्षेत्रात किंवा त्यालगत प्रवेश करण्यास आणि कोणत्याहीवेळी खाणकामांची तपासणी करण्यास आणि वरील शर्त (५) अनुसार परवानाधारकाने ठेवलेल्या लेखा पुस्तकांतील लेख्यांची तपासणी करण्यास आणि माल पाठविणे, विक्री इत्यादींच्या तपशिलांची पडताळणी करण्यास परवानगी देईल.

(१२)परवाना दिलेल्या मर्यादेपेक्षा अधिक प्रमाणात कोणताही माल काढून नेल्याचे आढळून आल्यास, तो माल सरकारजमा करण्यात येईल आणि महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,१९६६ आणि खाण व खनिजे (विनियमन व विकास) अधिनियम,१९५७ यांखालील तरतुदीनुसार परवानाधारक शिक्षेस पात्र असेल.

(१३)या शर्तींचा भंग केल्याचे दिसून आल्यास, परवाना रद्द करण्यात येईल आणि त्या ठिकाणी पडून राहिलेल्या खनिजमाल सरकारजमा करण्यात येईल.

(१४)परवान्यात मंजूर केलेला खनिज माल काढून संपल्यावर,परवानाधारकपरवाना सक्षम अधिका-याला परत करील आणि काढून घेण्यात आलेल्या खनिज मालाचे प्रमाण, वाहतुकीचे व ज्यांना हा माल विकण्यात आला त्या पक्षकारांचे नाव आणि त्यासाठी मिळालेली किंमत यांचे तपशील दर्शविणारे संपूर्ण विवरणपत्र सक्षम अधिका-याला करील आणि सक्षम अधिका-याने छाननी करण्यासाठी मागणी केल्यानुसार कोणतेही तपशील,पुस्तके इत्यादी त्याच्याकडे सादर करील.

(१५)परवानाधारक हा, परवान्यात मंजूरी दिलेल्या क्षेत्राबाहेर वाहतुकीच्या कोणत्याही साधनाने पाठवण्यात येणा-या प्रत्येक वाहनासोबत वाहतूक पास देईल.

प्रत्येक पासवर वाहनाचा क्रमांक,दिनांक,निघण्याची वेळ,गौण खनिजाचा प्रकार,कुठून कुठे वाहतूक करीत आहे. त्याचा तपशील नमूद करणे आवश्यक राहील.

(१६)प्रत्येक परवानाधारक पुढील महिन्याच्या १० तारखेच्या आत खाणीच्या ठिकाणाहून काढण्यात आलेल्या मालाचे प्रमाण परवानाधारकाचे नाव,खाणीच्या ठिकाणावरील विक्री किंमत यांचे मासिक विवरणपत्र नमुना-ड मध्ये सर्वाधित महसूल प्राधिकारी किंवा खाणकाम अधिकारी याच्याकडे सादर करील.

७. सर्वसाधारण शर्ती:-

(१) खाणकाम सुरु करण्यापूर्वी आवश्यक तो सर्व सांविधिक परवानगी घेण्यात येईल

(२) खाणकाम केवळ दिवसा करण्यात येईल.

(३) कोणत्याही पुलाच्या आणि/किंवा बंधा-याच्या सुरक्षा क्षेत्रात कोणतेही खाणकाम करण्यात येणार नाही.

(४)पुरातत्त्वशास्त्राच्या दृष्टीने महत्त्वाच्या नैसर्गिक किंवा मानवनिर्मित ठिकाणांच्या सानिध्यात खाणकाम करण्यात येणार नाही.

(५)प्रकल्पासाठी पाण्याची जरूरी असल्यास खाणपट्टाधारक आवश्यक त्या प्रमाणात पाणी काढण्यासाठी (भूपृष्ठावरील पाणी किंवा भूजल) सक्षम प्राधिकरणांची आवश्यक ती पूर्वपरवानगी घेईल.

(६) जर काही सांडपाणी असेल तर, पर्यावरण व वन मंत्रालय किंवा केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी विहित केलेल्या मानकांनुसार योग्य प्रकारे साठविण्यात येईल व त्यावर योग्य ती प्रक्रीया करण्यात येईल.

(७)कोणत्याही वन्यजीवनाचे उल्लंघन करण्यात येणार नाही.

(८) कोणतेही खनिज सांडू नये किंवा त्याची धूळ उडू नये यासाठी, ट्रक किंवा ट्रेक्टर्स ताडपत्रीने किंवा योग्य अशा इतर साधनांने झाकून खनिज मालाची वाहतूक केली जाईल.

(९) केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने विहित केलेल्या मर्यादेत ध्वनी प्रदूषण नियंत्रित राहण्यासाठी उपाययोजना करण्यात येतील.

इतर अटी व शर्ती

(१)परवानाधारकास गौण खनिज वाहतुकीकरीता सदर आदेशात नमुद वाहनाव्यतिरिक्त वाहन वापरायचे असल्यास त्याबाबत या कार्यालयाची पुर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील.

(२)परवानाधारकाने सदर आदेशात नमुद केलेल्या वाहनांच्या व्यतिरियत इतर वाहनाने गौण खनिज वाहतुक केल्याचे आढळून आल्यास सदरची गौण खनिज वाहतूक अनधिकृत समजून महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ मधील नियम ४८ (७) नुसार परवानाधारक कारवाईस पात्र राहील.

(३)सदरचा अस्थायी परवाना हा प्रश्नाधीन स.नं./ग.नं. चा समावेश जिल्हा खाणकाम आराखडयामध्ये जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी समाविष्ट करणेचे अटीवर देण्यात येत आहे.

(४)उत्खननाच्या ठिकाणी व भरावाच्या ठिकाणी जाण्यासाठी जिल्हा खनिकर्म अधिकारी,महसूल अधिकारी आल्यास यांना संबंधित हिश्शेदाची जबाबदारी उपलब्ध करून देणार.

(५)परवानाधारक याना स्फोटकाव्दारे उत्खननाची आवश्यकता असल्यास सक्षम प्राधिकारी यांचेकडून परवानगी घेवुनच उत्खनन करावे.

(६)विषयांकित ठिकाणी उत्खननाबाबत कोणतीही हरकत उपस्थित झाल्यास चौकशी अंती सदर परवाना रद्द करण्याचा अधिकार अपर जिल्हाधिकारी यांनी राखून ठेवला आहे.

(७)परवानाधारक संस्थेस परवानगी क्षेत्राव्यतिरीक्त इतर क्षेत्रातुन कोणत्याही प्रकारचे गौणखनिज अथवा इतरत्र बाहेरून आणून भराव करता येणार नाही.

(८)परवानाधारक उत्खनन केलेले गौण खनिज वन खात्याच्या जागेवर किंवा मेंढोज (कांदळवन) असलेल्या जागेत टाकण्यात येऊ नये. असे केल्यास नियमानुसार परवानाधारक यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

(९)शासनामार्फत जी.एस.टी.अंतर्गत निश्चित केलेली कराची रक्कम नियमाप्रमाणे शासन जमा करणे परवानाधारकावर बंधनकारक राहील.त्याबाबत परवानाधारक यांनी शपथपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

(१०)उत्खननाच्या परवानगीबाबत राज्य शासनाने वेळोवेळी दिलेले निर्देश परवानाधारकास बंधनकारक राहतील. शासन निर्देशानुसार जर परवाना कोणत्याही कारणास्तव रद्द केल्यास परवानाधारक मा.न्यायालयात दाद मागणार नाही अथवा अपील करणार नाही.

(११)शासनामार्फत सध्या अस्तित्वात असलेल्या स्वामित्वधनाच्या दरात वाढ झाल्यास होणारी स्वामित्वधनाची फरकाची रक्कम भरणे परवानाधारक यांच्यावर बंधनकारक राहील.

(१२)अनंदार यांनी वनविभाग यांचेकडून आवश्यकता असल्यास ना-हरकत दाखला घेणे बंधनकारक राहील.

(१३)सदरच्या आदेशान्वये परवानाधारक यांना खालीलप्रमाणे निर्गत परवाना पुस्तके देणेत येत आहे.

तपशील	परवाना पुस्तक क्रमांक पासून	परवाना पुस्तक क्रमांक पर्यंत	एकुण परवाना पुस्तक
मातो निर्गत परवाना पुस्तक			
दगड निर्गत परवाना पुस्तक			
	एकुण		

(१४)सदर परवान्याची मुदत दि. १३/०३/२०२० ते दि. १२/०८/२०२० पर्यंत राहील. त्यानंतर कोणत्याही कारणास्तव सदर परवान्यास मुदतवाढ देता येणार नाही.

(१५)वरीलप्रमाणे परवानाधारकाने सर्व अटी/शर्तींचे पालन करणे बंधनकारक आहे.

(१६)उपरोक्त अटींचे व शर्तींचा भंग झाल्यास सदरची परवानगी रद्द समजणेत येईल.

स्वाक्षरी/-
(वैदेही रानडे)
अपर जिल्हाधिकारी ठाणे

प्रत :

१. मे. अॅमर्ज हाऊसिंग इंडिया प्रा.लि. अर्सेट कस्ट्रक्शन इंडिया प्रा.लि. मौजे-चिंतळसर-मानपाडा ता.जि.ठाणे

२. उपविभागीय अधिकारी ठाणे/ तहसिलदार ठाणे /दक्षता पथक ठाणे-१
उपरोक्त परवान्यानुसार गौणखनिजाची वाहतुक नियमानुसार होते आहे काय याची नियमीत तपासणी करावी व अनधिकृत वाहतुक होत असल्यास आढळून आल्यास चौकशी करून अहवाल सादर करावा

३. जिल्हा खनिकर्म अधिकारी :-
उपरोक्त परवान्यानुसार गौणखनिजाची वाहतुक नियमानुसार होते आहे काय याची नियमीत तपासणी करावी व अनधिकृत वाहतुक होत असल्यास अहवाल सादर करावा. अनंदार संस्था याना देण्यात आलेल्या उत्खनन दिलेल्या परवानगीमधील अटी व शर्तींचा भंग झाला किंवा कसे? याबाबत खात्री करावी. सदर परवान्यामधील अटी व शर्तींचा भंग झाला असलेचे आढळून आल्यास याबाबत अहवाल सादर करणेत यावा. प्रश्नार्थक स.न./ग.न. जिल्हा खाणकाम आराखड्यामध्ये समाविष्ट करणेची जबाबदारी आपली राहील.

(मुकेश ग. पाटील) १३/३/२०२०
तहसिलदार रेतीगट
अपर जिल्हाधिकारी ठाणे करीता

अपर जिल्हाधिकारी ठाणे
जिल्हा ठाणे

प्रत्यक्ष हजर मा. अपर जिल्हाधिकारी
ठाणे यांची प्रत्यक्षरी अटी